राज्य शासनाच्या बालनाट्य मंडळावर श्रद्धा कळंबटे यांची नियुक्ती

रत्नागिरी : ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या, स्वयंसेतूच्या संस्थापक–अध्यक्ष श्रद्धा कळंबटे यांची राज्य शासनाच्या बालनाट्य मंडळावर नुकतीच नियुक्ती करण्यात आली. गेली १५ वर्षे त्या शासनाच्या महिला व मुलांच्या विविध समित्यांवर कार्यरत आहेत. रत्नागिरी जिल्हा विधीसेवा प्राधिकरणाच्या समेट समिती, लोकन्यायालय, महिला सुरक्षा समिती, अनैतिक व्यापार प्रतिबंध समिती इ. महत्वपूर्ण पदांवर त्यांनी कार्य केले आहे. सध्या त्या लोकअदालत पॅनेल सदस्य, जिल्हा सनियंत्रण समिती, कामाच्या ठिकाणी होणारा लैंगिक छळ तक्रार निवारण समिती इ. समित्यांवर कार्यरत आहेत. गेली ९ वर्षे त्यांनी राज्य शासनाच्या बालकल्याण समितीवर आपला कार्यकाल यशस्वीपणे पूर्ण केला आहे. या कालावधीत त्यांनी आपल्या अधिकारांचा पुरेपूर वापर करून जिल्ह्यातील निराधार, पिडीत मुलांच्या पुनर्वसनाबाबत महत्वपूर्ण कार्य केले आहे. विशेषतः वासनाकांडात बळी पडलेल्या तरूणींना समाजात मानाने जगण्याची प्रेरणा देऊन त्यांचे पुनर्वसन केले. त्यांना जगण्याची नवी उमेद दिली.

त्यांच्या याच कार्याची दखल घेवून राज्य शासनाने त्यांची बालनाट्य मंडळासारख्या महत्वपूर्ण समितीवर नियुक्ती केली आहे. जिल्ह्यातील ० ते १८ वयोगटातील विधीसंघर्षग्रस्त मुलांच्या समस्या निवारण व पुनर्वसनाचे कार्य ही समिती करते. जिल्हा बालविकास अधिकारी शेख व राज्य शासन यांनी वेळोवेळी त्यांच्या कार्याची दखल घेऊन पिडीतांसाठी कार्य करण्याची संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल श्रद्धा कळंबटे यांनी त्यांचे मनःपूर्वक आभार मानले आहेत. त्यांच्या या नियुक्तीबद्दल सर्वसामान्य जनतेकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.